## **प्रेसनोट दिनांक - २५/०६/२०१९**

## **डेक्कन पोलीस स्टेशन, पुणे शहर**

जेष्ठ नागरीकास गाडी पार्क केलेले ठिकाण आठवत नसल्याने प्रभात बिट मार्शलने गाडीचा शोध घेवुन गाडी ताब्यात दिली.

---

दिनांक २३/०६/२०१९ रोजी १४/०० वा. सुमारास जेष्ठ नागरीक श्री. मुकूंद कटककर, वय ७० वर्षे, रा. शुक्रवार पेठ, सुभाष नगर पुणे मो. ७७४४०८५१७६ यांनी प्रभात पोलीस चौकी येथे येवुन आपली टी.व्ही.एस. वेगो नंबर एम.एच १२ जे. पी. ३३७० ही प्रभात रोड, पुणे येथे सकाळी ११/०० वा. पार्क करुन कामानिमित्त गेले परत आले असता त्यांना गाडी कोणत्या ठिकाणी पार्क केली आठवत नसल्याने प्रभात पोलीस चौकी येथे येवुन माहीती दिली. लागलीच प्रभात बिट मार्शल वरील कर्मचारी श्री कांबळे पोशि ८७८१ व श्री शिंदे पोशि ९९६७ यांनी सदर गाडीचा प्रभात चौकी हद्दीमध्ये शोध घेतला असता कमला नेहरु पार्क जवळ गाडी मिळुन आल्याने श्री. मुकूंद कटककर यांना कमला नेहरु पार्क येथे बोलावुन त्यांची गाडी ताब्यात दिली. त्यांनी आपली गाडी मिळाल्याने आनंद व्यक्त करुन प्रभात बिट मार्शलचे आभार मानले आहेत.

